**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष</u>**

**<u>सरतपास शपथेवर वादीचे विधिज्ञ श्री. बी.एम.दळवी यांच्या मार्फत</u>**

०७. मी आजरोजी आठपट नकाशा माझ्यासोबत आणलेला नाही. माझ्या कार्यालयामध्ये सदरचा आठपट नकाशा उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ज्यावेळेस मोजकाम केले होते त्यावेळेस आठपट नकाशा कार्यालयामध्ये उपलब्ध होता. मला दि. १९/१२/२०२३ रोजी माझी साक्ष नोंदविल्यानंतर ते आजरोजीपर्यंत आठपट नकाशा तयार करण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी केलेले कोर्ट कमिशनचे काम पाहण्यासाठी आठपटीचा नकाशा आवश्यक आहे. मी आता आठपटीचा नकाशा तयार करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी काढलेल्या नकाशामध्ये दाखविलेल्या हद्दी आठपट नकाशाशी जुळणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी काढलेल्या नकाशाच्या हद्दी मुळ गटबुक नकाशाच्या हद्दीशी जुळणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्र. ३४/१९९६ मध्ये माझी न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी उपरोक्त दाव्यामध्ये दावा मिळकतीची मोजणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या मोजणीचा अहवाल न्यायालयामध्ये दाखल केला होता. हे माझ्या लक्षात नाही की, वरील दाव्यामध्ये दाखल केलेला अहवाल व प्रस्तुत दाव्यामध्ये दाखल केलेला अहवाल सारखा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरील दाव्यामध्ये प्रस्तुत दाव्यातील वादीने त्यास आक्षेप घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, वरील दावा हा स.नं. २९२ हि.क्र. १३ चे मालक सुकांती कमलाकर सावंत यांनी प्रस्तुत दाव्यातील वादीविरुध्द दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, वरील दाव्यामध्ये मला साक्षीसाठी न्यायालयाकडून साक्षीसमन्स प्राप्त झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, वरील दाव्यामध्ये माझी साक्ष नोंदविली गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर दाव्यामध्ये नकाशा चुकीचा काढला असल्याचे मान्य केले होते. हे मला सांगता येत नाही की, प्रस्तुत दाव्यातील वादीने नकाशा चुकीचा असल्याने नकाशा रद्द करण्यासाठी अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि. १५/०३/२००५ रोजी न्यायालयाने आदेश पारीत करुन मी काढलेला नकाशा रद्द केला होता. मला असे काही वाटले नाही की, माझा वरील दाव्यामध्ये

नकाशा रद्द केल्यामुळे प्रस्तुत दाव्यामध्ये न्यायालयीन आयुक्त म्हणून काम करु नये. मी वरील दाव्यामध्ये चुकीचा नकाशा काढल्याबाबतची माहिती माझ्या वरिष्ठांना दिली नव्हती. मला असे काही वाटले नाही की मी वरील दाव्यामध्ये पुर्वी न्यायालयीन आयुक्त म्हणून काम केले होते त्यामुळे प्रस्तुत दाव्यामध्ये न्यायालयीन आयुक्त म्हणून काम करु नये. हे मला सांगता येणार नाही की, मी यापुर्वी कुठल्या कामामध्ये न्यायालयीन आयुक्त म्हणून काम केले. मी पुर्वी केलेला न्यायालयीन आयुक्त काम रद्द झाले होते याबाबती माहिती माझ्या कार्यालयाला आहे. हे मला सांगता येणार नाही की, माझ्या कार्यालयाने नकाशा रद्द झालेला असतानाही प्रस्तुत दाव्यामध्ये न्यायालयीन आयुक्त म्हणून माझी नेमणूक का केली होती.

०८. मला आता नि.क्र. ५४ वरील गटबुक नकाशा दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की नि.५४ वरील नकाशा आठपट केल्यानंतर दाखविलेले घर स.नं. ३९२ हि.क्र. १२ मध्ये येईल. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ११३ मध्ये पश्चिमेकडे दाखविलेली संपुर्ण लाईन एन, डी व सी ने दाखविलेली हि.क्र. १२ ची हद्द आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.दि.दावा क्र. ३४/१९९६ मधील वादीला व प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादीला वाचविण्यासाठी चुकीचे न्यायालयीन आयुक्त काम केले होते. हे म्हणणे खरे नाही की, हि.क्र. १३ मध्ये दाखविलेले घर चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीसोबत संगनमत करुन हि.क्र. १२ मध्ये घर न दाखविता हि.क्र. १३ मध्ये दाखविलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीकडून त्यासाठी पैसे घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे व बेकायदेशीर न्यायालयीन आयुक्त काम केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

<u>**प्रतिवादीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. एस.एस.गवाणकर यांचेमार्फत**</u>

०९ हे म्हणणे खरे आहे की, माझी दि. १९/१२/२०२३ रोजी साक्ष नोंदविल्यापासून ते आजरोजीपर्यंत न्यायालयाने मला आठपट नकाशा तयार करुन आणण्यासाठी सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नकाशाच्या आकारमानात फरक पडत

असला तरी जागेवरील वस्तुस्थितीमध्ये फरक पडत नाही. हे म्हणणे खरे आहे की, एकास एक हजार असे प्रमाण घेतले व वीस साखळी पध्दतीने मोजमाप केले तरी जागेवरील वस्तुस्थतीमध्ये फरक येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ११३ वरील नकाशामध्ये एफ अक्षराने दर्शविलेले प्रतिवादीचे घर हि.क्र. १३ मध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी केलेल्या मोजणीप्रमाणे प्रतिवादीचे घर हि.क्र. १२ मध्ये येत नाही. मोजणी झाल्यानंतर नकाशाची व मुळ अभिलेखाची मुख्यालय सहाय्यक तपासणी करतात. हे म्हणणे खरे आहे की, नकाशा व मुळ अभिलेख बरोबर असल्यास मुख्यालय सहाय्यक सदरचा नकाशा उप अधिक्षक भूमी अभिलेख यांच्या समक्ष ठेवतात. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ११३ वरील नकाशाची तपासणी ही मुख्यालय सहाय्यक यांनी केली व केलेली मोजणी बरोबर असल्यामुळे सदरचा नकाशा उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्या समक्ष ठेवला होता. हे म्हणणे खरे आहे की, उपअधिक्षक भूमी अभिलेख यांनी नकाशाची तपासणी करुन तो बरोबर असल्याची खात्री झाल्यानंतर नकाशा न्यायालयाकडे सादर केला होता. हे म्हण्णे खरे आहे की, नि.क्र. ११३ वरती नकाशा बरोबर असल्यामुळे उपअधिक्षक भूमी अभिलेख यांनी त्यांचा शिक्का मारुन सही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नकाशा चुक असल्यास रद्द करण्याचा अधिकार जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांना आहे. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजीपर्यंत जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांनी नि. ११३ वरील नकाशा चुकीचा आहे म्हणून रद्द केलेला नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, नि.दि.दावा क्र. ३४/१९९६ मधील नकाशा मी तयार केला आहे ही बाब दर्शविण्यासाठी मला आजरोजी कुठलाही दस्त दाखविला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या विधिज्ञांनी नि.दि.दावा क्र. ३४/१९९६ मध्ये मी न्यायालयीन आयुक्त म्हणून काम केले होते असे सांगितल्यामुळे मी त्यांच्यावरती विश्वास ठेवून त्यामध्ये न्यायालयीन आयुक्त म्हणून काम केले होते असे सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी नि.दि.दावा क्र. ३४/१९९६ मध्ये न्यायालयीन आयुक्त म्हणून काम केले होते किंवा नाही हे दस्त पाहिल्यानंतरच सांगू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, नि.दि.दावा क्र.३४/१९९६ मध्ये न्यायालयीन आयुक्त अहवालाचे काय झाले होते याबाबत मला वयैक्तिक माहिती नाही. हे

म्हणणे खरे आहे की, वादीच्या विधिज्ञांनी मला नि.दि. दावा क्र. ३४/१९९६ मधील न्यायालयीन आयुक्त रद्द झाल्याचे सांगितल्यामुळे मी न्यायालयीन आयुक्ताचा अहवाल रद्द झाला होता असे सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.दि.दावा क्र. ३४/१९९६ मधील न्यायालयीन आयुक्त अहवाल रद्द झाल्याचे माझ्यास वयैक्तिक पाहण्यामध्ये आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाकडून न्यायालयीन आयुक्ताचा अहवाल रद्द झाल्यास त्याबाबतची टिपणी आमच्या कार्यालयामध्ये ठेवली जाते. हे म्हणणे खरे आहे की, नि.दि.दावा क्र. ३४/१९९६ मध्ये न्यायालयीन आयुक्त अहवाल रद्द झाल्याबाबतची कार्यालयीन टिप्पणी मी पाहिलेली नाही. मला न्यायालयाने रद्द केलेला न्यायानयीन आयुक्त अहवाल व माझ्या वरिष्ठ कार्यालयाने रद्द केलेला अहवाल यामधील फरक कळतो. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ पासून आजरोजीपर्यंत वाद मिळकतीबाबत मी काढलेला नकाशा न्यायालयाने रद्द केल्याचे मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही पक्षापैकी एका पक्षास विशेष मदत व्हावी यासाठी मी न्यायालयीन आयुक्ताचे काम केलेले नाही.

११. ' नमो ' यांचा अर्थ न मोजलेले असा होतो. हे म्हणणे खरे आहे की, 'नमो नकाशा ' याचा अर्थ न मोजलेला नकाशा असा होतो. न मोजलेले नकाशे हे ब्रिटीशांनी तयार केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, डोंगराळ भागाचे न मोजलेले नकाशे तयार केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, न मोजलेल्या नकाशामधील क्षेत्र हे अचुक असत नाही. हे म्हणणे खरे आहे की, न मोजलेल्या नकाशामधील सर्व क्षेत्र हे नजरमानेवरुन मोजलेले असते. हे म्हणणे खरे आहे की, नजरमान म्हणजे नजरेने मोजणे होय. हे म्हणणे खरे आहे की, मी अलीकडील नवीन साधनाच्या आधारे हि.क्र. १२ व हि.क्र. १३ ची मोजणी केलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी मोजलेल्या नकाशामध्ये हि.क्र. १२ चे ७/१२ मध्ये नमूद असलेले क्षेत्र मोजणीमध्ये आढळले होते व सदरचे क्षेत्र मी मोजलेल्या नकाशामध्ये समाविष्ठ आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी मोजलेल्या नकाशामध्ये हि.क्र. १३ चे ७/१२ प्रमाणे नमूद असलेले क्षेत्र घरासहित मोजणीमध्ये आढळले होते व सदरचे क्षेत्र मी मोजलेल्या नकाशामध्ये समाविष्ठ आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीमध्ये प्रतिवादीने वादीच्या हि.क्र. १२ मध्ये कुठलेही

बांधकाम  केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत दाव्यातील न्यायालयीन आयुक्ताचे काम व इतर आणखीन एक दावा मिळकतीच्या संदर्भाने न्यायालयीन आयुक्ताचे काम केलेले आहे, याशिवाय इतर कुठल्याही प्रकरणामध्ये न्यायालयीन आयुक्त म्हणून काम केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या माहितीप्रमाणे दावा मिळकतीसंदर्भाने तिसऱ्या व्यक्तीने आणखीन एक मोजणी केलेली आहे, मी तिसरी मोजणी केलेली नाही.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : २४/०९/२०२४

महेश रा. देवकते
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण